## ॥बाबा ॥
## पाणी

त्रिवेणी संगम आहे क्षेत्र वांगणी
नर्मदा ही आली आहे तुझे चरणी
विनविते वारंवार चक्रपाणी
घेई रे मोहना आता शुध्द पाणी ॥ धृ ॥

बैसुनी एका स्थळी खेळसी चेंडूफळी
हैराण करीसी गोप-गौळणी
सूत्र हाती तुझ्या सा-या त्रिभुवनी
तुझ्यापुढे हार आमची क्षणोक्षणी ॥ 1 ॥

या पाण्याचे विशाल पात्र
जमती तेथे त्याचीच गोत्र
लांबी, रूंदी, खोली अंत काहीच नाही
अंशतः सारे सामावून घेई
सहजयोगी आहे येथे जुळणी ॥ 2 ॥

आटणार नाही सुकणार नाही
प्रात्यक्षिक सुरू आहे सारे स्वानुभवी
बाबा तत्त्व झरा आहे त्याच्या उगमी, तुच पाणी
आम्ही सारे व्याकुळ तहानी
देई रे कान्हा तुझे उच्छीष्ट पाणी
जीवनाची तृप्तता आहे तुझे चरणी ॥ 3 ॥

★★★★★